सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रा‍थमिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जं. ४९१ ठ. क्र. ६१
दि. ४/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका उद्यान विभागाकडील पशुवैद्यकीय अधिकारी या पदाकरीता जाहिर प्रसिध्दीकरण करुन प्राप्त झालेल्या अर्जामधून श्री.डॉ.घनश्याम मो.पवार यांची एकवट मानधन रुपये १८०००/- यावर आज्ञापत्रातील शर्ती व अटीनुसार सहा महिन्याच्या कालावधीकरीता नेमणूक करण्यांत आलेली असून,सदर नेमणूकीची मुदत दिनांक १०/१२/२०१४ रोजी संपुष्टात येत असल्याने,प्रस्तावात नमूद कारणास्तव त्यांना मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) अन्वये नव्याने निर्माण केलेल्या पशुवैद्यकीय अधिकारी पदास व उपरोक्त कार्यरत सेवकास दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दिनांक १३/१२/२०१४ पासून पुढे एक वर्षासाठी मुदतवाढ देणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा.म.न.पा.ची मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दिनांक ७/१२/२०१४ चे टिपणीने आलेले प्रकरणी मा.स्थायी समिती ठ.क्र.४७९ दि.१९/१२/१४ ने आजला सोलापूर महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारे मानधनावर घेण्यांत आलेल्या एकूण कर्मचा-यांची संख्या किती आहे व त्यांना दरमहा किती मानधन देण्यांत येत आहे या माहितीसह प्रकरण फेर सादर करणेस,मान्यता देणेत येत आहे असा ठराव पारित केलेला आहे. त्यानुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे माहिती असून, सदरची माहिती मा.स्थायी समितीस अवगत करणेकामी तसेच डॉ.घनश्याम मो.पवार यांची मुदतवाढीने देण्यांत आलेल्या नियुक्तीची मुदत दिनांक १०/१२/२०१४ रोजी संपुष्टात आल्याने,मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये नव्याने निर्माण केलेल्या पशुवैद्यकीय अधिकारी पदास व कार्यरत सेवकास दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दिनांक १३/१२/२०१४ पासून पुढे एक वर्षासाठी मुदतवाढ देणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा.म.न.पा.ची मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दिनांक १०/२/२०१५ चे टिपणी प्रमाणे मा. स्थायी समिती ठराव क्र. ७५७ दिनांक २७-२-१५ चे शिफारशी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रमुलो~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४९५ ठ. क्र. ६२
दि. ४/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



मंडल रेल प्रबंधक (कार्य) सोलापूर यांना नळ कनेक्शन देणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. --/ र.रुपये १८,४९,४३०/- यांस मा. स्थापत्य समितीची व मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ४-२-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ४५९, दिनांक ५-३-२०१५ चे शिफारशी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४९६ ठ. क्र. ६३
दि. ४/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. २२ मध्ये दत्त नगर परिसरात पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन घालणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. ०८/२०१४-१५ र.रु. ३०,००,०००/- यांस मा. स्थापत्य समितीची व मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ३१-१-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ४७५, दिनांक ५-३-२०१५ चे शिफारशी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जा. ४९८ ठ. क्र. ६४
दि. ४।६।१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. अजयकुमार गणपत चव्हाण - सहा. उद्यान अधिक्षक पदी एकवट मानधनावर नियुक्ती सेवकास मुदतवाढीबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव नगरअभियंता यांनी दिनांक २१-२-२०१५ ने सादर केलेला अहवाल पाहता व कामाची निकड पाहता श्री. अजयकुमार ग. चव्हाण यांची सहाय्यक उद्यान अधिक्षक यांचे मानधनावरील नियुक्तीच्या कालावधीत केलेल्या कामाबाबत ठरावात नमूदप्रमाणे तपशीलवार माहितीसह फेर सादर करावे असा ठराव मा. स्थायी समिती ठराव क्र. ५९६ दिनांक ९-१-२०१५ ने ठराव पारित करण्यांत आलेला आहे. त्यास अनुसरुन श्री. अजयकुमार ग. चव्हाण यांची मुदत दिनांक १४-१२-२०१४ रोजी संपुष्टात येत असल्याने त्यांना मुं.प्रां.अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये नव्याने निर्माण केलेल्या सहाय्यक उद्यान अधिक्षक पदास व सदर सेवकास दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि. १७-१२-२०१४ पासून पुढे एक वर्षासाठी मुदतवाढ देणेकामी मा. स्थायी समिती मार्फत मा. म.न.पा.चे मान्यतेस्तव निवेदन सादर केले असता मा. प्रभारी आयुक्त यांनी प्रथम नियुक्ती दिनांक १५-६-२०१४ पूर्वी मा. स्थायी समिती सभेची पूर्व मंजूरी घेतली होती काय ? आणि इतर कांहीही असले तरी प्रथम नियुक्ती दिनांकानंतर ६ महिने पेक्षा जास्त कालावधी साठी मुदतवाढ द्यावयाची झालेस मा. सर्वसाधारण सभेची पूर्व मंजूरी आवश्यक आहे. मा. सर्वसाधारण सभेच्या निर्णयास्तव मा. प्रभारी आयुक्त यांचे दिनांक २१-२-२०१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ४९९ ठ. क्र. ६४ दि. ४।६।१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



जन्नतूल फिरदोस मुस्लीम कब्रस्तान येथे विविध सुधारणा करणे या कामाअंतर्गत होत असलेल्या एक्स्ट्रॉ आयटेमबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित प्रकरणी सन २०१२-१३ भांडवली कामे अंतर्गत स्मशानभूमी व दफनभूमी सुधारणा निधीमधून ३०.०० लाखाची बजेट तरतूद उपलब्ध केलेली आहे. सदर एक्स्ट्रॉ आयटेमचा खर्च र.रु. ५,७०,५१६/- इतका येत असून, डिलीट होणारे क्र. १ ते ५ आयटेमचा खर्च र.रु. ७,९५,१६४/- व एक्स्ट्रॉ क्र. १ ते ३ आयटेमचा खर्च र.रु. ५,७०,५१६/- इतका होत असल्याने केवळ टेंडरमध्ये उपरोक्त कामाचा समावेश नसल्याने ते एक्स्ट्रॉ आयटेम विचारात घेणे आवश्यक आहे. यामध्ये र.रु. २,२४,६२८/- इतकी सेव्हींग होणार आहे. त्यासाठी कोणताही जादा खर्च मक्तेदारास देणेची आवश्यकता भासणार नाही असे नमूद केले आहे. विषयांकित कामास मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १९८ दिनांक २०-१-२०१४ रोजी अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. सबब सुधारित अंदाजपत्रकास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेस्तव मा. प्रभारी आयुक्त यांचे दिनांक २०-२-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~चालू/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५२० ठ. क्र. ६६
दि. ४।६।९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



मौजे मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नं. २७२ नविन सर्व्हे नं. १८ या जागेतील लेआऊटला सोलापूर महानगरपालिका सहा. संचालक नगर रचना कार्यालयाने आदेश क्र. ६३४, दि. ७-६-१९९६ अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदर मंजूर रेखांकनातील उपभूखंड क्र. अे-१/अे-२८/डी-१/डी-२/डी-२०/डी-१९/बी-१/बी-२/बी-२३/बी-२४ च्या दक्षिणेकडील बाजूस पूर्व-पश्चिम ९.०० मिटर रुंदीचा रस्ता मंजूर रेखांकनाप्रमाणे आहे व त्याप्रमाणे जागेवर विकास झालेला आहे.

तद्‌नंतर विकास योजनेनुसार याठिकाणी २४.०० मि. रुंदीचा रस्ता दर्शविलेला आहे. त्यामुळे याठिकाणी सन १९९६ मध्ये लेआऊटला मंजूर घेऊन त्यानुसार घरे बाधण्यांत आलेला असल्याने सदरची सर्व घरे २४.०० मि. रुंद रस्त्याचे बाधीत होणार आहे. त्यामुळे बरेच प्लॉटधारक बेघर होणार आहेत.

तरी सदर ठिकाणी मंजूर लेआऊट प्रमाणे बांधकाम परवानगीने घरे बांधलेली असल्याने याठिकाणी आता २४.०० मि. ऐवजी मंजूर रेखांकनानुसार ९.०० मि. रुंद रस्ता याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ प्रमाणे फेर बदल करण्यांस व त्याप्रमाणे रस्ता मंजूरीकरिता शासनाकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रमुलो~~/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५०६ ठ. क्र. ६४ दि. ४।६।१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



मानधनावरील वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकारी यांचे मुदतवाढीबाबत प्रस्तावात नमूद तक्त्यातील उमेदवार व त्यांचे नावा समोरील नमूद केलेले मानधनमध्ये पूर्ण वेळ नियुक्ती करुन त्यांना देण्यांत आलेली मुदतवाढमध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे २ दिवसाचा खंड देऊन ६ महिन्याच्या कालावधीकरिता करार पध्दतीने एकवट मानधनावर मुदतवाढ देणेकामी सहा. आयुक्त (स) यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर प्रथम नियुक्ती दिनांकापासून ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी होत असल्याने मा. सर्वसाधारण सभेच्या निर्णयास्तव मा. प्रभारी आयुक्त यांचे दिनांक ५-३-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४०८ ठ. क्र. ६८
दि. ४/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील पूर्व विभागात मोठया प्रमाणावर विणकर समाज राहात असून गेल्या १०० वर्षापासून सदर समाज येथे विणकाम करुन उपजिविका करीत आहे. अशा कष्टकरी विणकर समाजातील कामगारांना त्यांच्या कामाच्या वेळेनंतर विरंगुळा व्हावा म्हणून रविवार पेठ येथे विणकर बाग तयार करण्यात आलेली आहे. सदर विणक र बागेत अनेक अबालवृध्द येऊन बागेचा आनंद लुटतात. या बागेमध्ये समाजाच्या पूर्व इतिहासाचा बोध होण्यासाठी तेथे विणकर कामागाराचा काम करीत असल्याचा ब्राँझची नवीन विणकराची प्रतिकृती बसविणेबाबत मोठ्या प्रमाणात मागणी येत आहे. त्यामुळे या ठिकाणी विणकर कामगाराची ब्राँझची नवीन प्रतिकृती बसविणे कामाचे व तद्अनुषंगीक कामे करणे कामी व त्याप्रमाणे प्लॅन व एस्टीमेट तयार करुन नवीन ब्राँझची विणकर कामगाराची प्रतिकृती बसविणेत यावी.

तरी याकामी सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकिय सभेतील पुतळा बसविणे व परिसर सुधारणा करणे याकामी रक्कम रुपये २.०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. सदर विणकर कामगाराची नविन ब्रॉझची प्रतिकृती बसविणेकामी र.रु.१५.०० लाखाची तरतूद, सदर अर्थसंकल्पीय तरतूदीतून उपलब्ध करुन देण्यात येत असून या तरतुदीमधून वरील काम करणेस व येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ ५२३ ठ. क्र ६९
दि. ४/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला



महाराष्ट्र शासन जनतेच्या कल्याणाकरिता विविध कल्याणकारी योजना राबविते. त्यापैकी रमाई आवास योजना ही एक आहे. विशेष समाज कल्याण विभाग व सो.म.पा. यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती, जमाती व नवबौध्द घटकांतील लोकांना कायमस्वरुपी निवारा मिळणेकरिता रमाई आवास योजनेतून पक्की घरे बांधण्याकरिता रक्कम रु. २.०० लाखाचे अनुदान देण्यात येते.

यापूर्वी याच विभागाकडून सोलापूरातील ७१० लाभार्थ्यांना याचा लाभ झालेला असून, ती घरे पूर्ण झालेली आहेत. परंतू गेल्या काही दिवसापासून उर्वरीत लाभार्थ्यांना या योजनेकरिता र.रु. ४८.०० कोटी उपलब्ध असताना देखील त्याचे वाटप करण्यात आले नाही. दलित समाज बांधवांना त्यांच्या न्याय हक्कापासून वंचित ठेवले जात आहे. म्हणजे त्यांच्यावर एकप्रकारे अन्याय केला जात आहे.

वास्तविक पाहता पहिल्या टप्प्यातील लाभार्थ्यांना जे निकष लावले होते तेच निकष यांना देखील लावले पाहिजेत. या संदर्भात आम्ही मा. रणजितसिंह देओल (समाजकल्याण आयुक्त पुणे) यांची देखील दि. ३-३-२०१५ रोजी समक्षतेत भेट घेऊन त्यांना या बेकायदा लावण्यात आलेल्या जाचक अटीबाबत चर्चा केली. तेव्हा आम्ही या अटी लावलेल्या नाहीत. पालिकेच्या अटी आहेत स्थानिक स्तरावर त्या सोडविण्यात याव्यात असे सांगितले आहे. तरी वरील सर्व बाबींचा विचार करुन महानगरपालिकेचे जे जाचक अटी लावले आहेत ते रद्द करुन पूर्वीप्रमाणेच कार्यवाही अंमलात आणणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्राथमिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.५.२५.ठ. क्र..६०.
दि..४.६.९५..... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील अक्कलकोट रोडवरील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरातील पोस्ट ऑफिस नंतरचे पुढील चौक (श्री. बोमडयाल कारखाना समोरील चौक) स्पीड रेडीमेड शोरुम समोरील चौकास पद्मशाली समाजाचे व वस्त्र निर्माते दैवत श्री. भावनाऋषी चौक असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. व असे नामकरण करण्याचे कार्यक्रमास येणारे खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/आमुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.क्र. २ ठ. क्र. ४९ दि. ४/६/१५ रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

कोंडा नगर अक्कलकोट रोड राज्यमार्ग क्र. १५१ मि.मि. ४७/६०० ते ४५/४०० येथील अतिक्रमणबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव शासन निर्णयातील निकषानुसार (सन २००० पूर्वीचे रहिवास पुरावे घेऊन) पुनर्वसन करणेची कार्यवाही करणेचे झालेस पुनर्वसनाअंती कर आकारणी, हद्दवाढ विभागाकडील डिमांड सदरी सदरहू पुनर्वसन केलेल्या रहिवाश्यांची नोंद कमी करणे याबाबत धोरणात्मक मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मा. स्थायी समिती मार्फत मा. सर्वसाधारण सभेकडे पाठविणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १३-१-१५ चे टिपणीप्रमाणे धोरणात्मक मान्यता मिळणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ८०१ दिनांक २४-३-१५ चे शिफारशी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मागुती/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ....९....ठ. क्र....७२ दि...२१.६.१५.....रोजी ठेवला खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

एकवट मानधनावरील करार पध्दतीने नियुक्ती केलेले प्रस्तावात नमूद १ ते ५ उपअभियंता यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दिनांक १२-३-१५ पासून सहा महिन्याच्या कालावधीकरिता करार पध्दतीने एकवट मानधन रु. ३५,०००/-वर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ (१) नुसार मुदतवाढ देण्यांस मा. प्र. आयुक्त यांचे टिपणीत नमूदप्रमाणे मान्यता मिळणेस्तव दिनांक १८-३-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

एक वर्षाच्या कालावधीसाठी नेमण्यास मान्यता देणेत येत आहे. व यापुढेही ते सेवक नियमीत सेवेत येईपावेतो प्रतिवर्षी दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 90 ठ. क्र. 63
दि. 4.6.15 राजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



भवानीराम सिकची धर्मशाळेकडील कर्मचा-यांबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव मा. आयुक्त यांचेकडे दिनांक १२-१२-२०१४ रोजी सादर करण्यांत आलेल्या प्रस्तावावर मा. आयुक्त यांनी सदर प्रस्तावावर उत्पन्नाची आणि प्रशासकीय खर्चाची मर्यादा विचारात घेत भवानीराम सिकची धर्मशाळेतील कर्मचारी हे महानगरपालिका आस्थापनेवर कायम करणे योग्य वाटत नाही असे आदेश दिले आहेत. तसेच सहा. आयुक्त (स) यांनी प्रस्तावात **ए** मधील परिशिष्टमध्ये नमूदप्रमाणे भवानीराम सिकची धर्मशाळेकडील रोजंदारी स्टाफ मनपाचे आस्थापनेवर घेणे संयुक्तीक वाटत नाही. तथापि तत्कालीन मा. अध्यक्ष, स्थायी समिती व मा. सभागृह नेता यांचे मागणीप्रमाणे प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास्तव मा. महासभेपुढे पाठविणेबाबत प्रस्ताव सादर केले असता मा. आयुक्त यांनी तत्कालीन आयुक्त यांचे दिनांक १२-१२-२०१४ रोजीच्या निर्णयानुसार संबंधित अर्जदारास विनंती अमान्य करणेत आलेचे लेखी कळविणेत यावे. प्रस्तावातील परिशिष्ट **प** प्रमाणे अवलोकनार्थ मा. सर्वसाधारण सभेस सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक १९-३-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

भवानीराम सिकची धर्मशाळेकडील कर्मचारी यांची म.न.पा.कडील आस्थापनेवर सेवा वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/खास सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ३० ठ. क्र. ०४ दि. ४/६/९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सन १९९२ मध्ये शहराचा विस्तार झाला. सोलापूर महानगरपालिकेत हद्दवाढ भागातील ११ गावांचा समावेश झालेला आहे. जुळे सोलापूर परिसरात उपनगरांची संख्या वेगाने वाढत आहे. या भागात राहणा-या नागरिकांच्या अनेक समस्या आहेत. त्यामध्ये विशेषत: एस.टी. स्थानकाचा प्रश्न मोठा आहे. हद्दवाढ भागातील उपनगरांमधून नागरिकांना शिवाजी चौकातील एस.टी. स्थानकाला जावे लागते. सदरचे अंतर खुप जास्त असून नागरिकांच्या वेळ, श्रम आणि पैशाच्या दृष्टीकोनातून ते परवडत नाही. रात्री परगांवाहून येणा-या प्रवाशांना हद्दवाढ भागातील उपनगरांत जाण्यासाठी वाहनांची उपलब्धता होत नाही व रात्रीचे वेळी महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

या पार्श्वभुमीवर जुळे सोलापूर परिसरात नेहरु नगरच्या शासकीय मैदानासमोरील (इंचगिरी मठासमोर) आरक्षित असलेल्या जागेवर एस.टी. स्टँड होणे अत्यंत गरजेचे व आवश्यक आहे. ही जागा जवळपास सहा एकर असून याठिकाणी एस.टी. स्थानक झाले तर विजापूर, हैद्राबाद, अक्कलकोट मार्गे प्रवास करणा-या प्रवाशांना शिवाय पुणे, मुंबई, कोल्हापूर, गोवा व इतर शहरांना जाणा-या प्रवाशांची देखील सोय होणार आहे. अशा या अतिशय महत्वाच्या आणि सर्वांच्या सोयीच्या ठरणा-या गोष्टीचा विचार करता. वर नमूद ठिकाणी बस स्थानक बांधणेकामी मा. महाराष्ट्र शासनास विनंती करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या सहकूल/वाजूली/विरोध सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ९६ ठ. क्र. ०५
दि. ३१.३.१५ रोजी ठेवला असता प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



नागरी समुदाय विकास प्रकल्प (UCD) अंतर्गत शिवणवर्ग शिक्षिका मानधनावरील पदास मुदतवाढीबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद तक्त्यातील १ ते १० शिवण शिक्षीकांचे मुदतवाढ दिनांक ३१-३-२०१५ अखेर संपुष्टात आल्याने व नागरी समुदाय विकास प्रकल्प संचालक यांचे दिनांक १७-३-२०१५ चे निवेदनाप्रमाणे शिवणवर्ग शिक्षीकांना दि. १-४-२०१४ रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि. २-४-२०१५ ते ३१-३-२०१६ अखेरच्या कालावधीकरिता मुदतवाढ देणेकामी महानगरपालिकेच्या मान्यतेची आवश्यकता असल्याने सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती मार्फत मा.मनपा पुढे सादर करणेकामी मा. सहा. आयुक्त (स) यांनी मा. आयुक्त यांचेकडे सादर केले असता मा. प्रभारी आयुक्त यांनी प्रथम नियुक्ती दिनांकापासून कालावधी ६ महिन्यापेक्षा जास्त असलेने मा. सर्वसाधारण सभेस निर्णयास्तव मा. प्रभारी आयुक्त यांचे दिनांक २३-३-१५ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामान्य/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ९८ ठ. क्र. ४६ दि. १९/१२/१४ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोमपा कडील उद्यान विभागातील श्री. सिध्देश्वर तुकाराम हजारे मजूर बडतर्फ सेवक यांनी त्यांचे बडतर्फी आदेशाविरुध्द मा.स्थायी समितीकडे अपील अर्ज केले असता,त्यावर मा.सभापती स्थायी समिती यांनी मा.आयुक्त यांचा अभिप्राय सादर करणेकामी दि.२८/१०/२०१४ रोजी मा.आयुक्तांचेकडे अर्ज पाठविले होते.सदर अपील अर्जावर मा.आयुक्त यांनी दिनांक ११/११/२०१४ रोजी त्यांचा अभिप्राय दिलेला असून, सदर अभिप्रायाची प्रत व मूळ अपील अर्ज मा.स्थायी समितीपुढे सादर करणेकामी आलेले प्रकरणी उपरोक्त सेवकास मा.आयुक्त यांनी सेवक सेवानिवृत्त दिवशी म्हणजे एक दिवस आगोदर दि.२९/९/२०१४ पासून सेवेतून बडतर्फ करण्यात आल्याचा आदेश देण्यांत आली आहे. त्याचे अवलोकन करता,सेवकाची निसर्गन्याय तत्वाप्रमाणे चौकशी झालेली नाही. सदरहू सेवकास दोषी धरणे पूर्णत: बेकायदेशीर व चुकीचे आहे व केस न्याय प्रविष्ठ असून प्रलंबित आहे.सेवकास सेवानिवृत्तीच्या एक दिवस आधी घाई घाईने बडतर्फ करण्यांत आले. ही गोष्ट चुकीचे असून त्यांच्या घरात कोणीही कमवते व्यक्ती नसून केवळ त्यांच्या वेतनावरच त्यांचे घर प्रपंच चालत आहे. श्री. सिध्देश्वर तुकाराम हजारे यांनी अपील अर्जात नमूद केलेल्या गोष्टींचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन व सदरहू सेवकाचे प्रकरण न्याय प्रविष्ठ प्रलंबित असल्याकारणाने तसेच सदरची घटना ही कामाच्या ठिकाणी घडलेली नाही.त्यांचे अपील अर्जातील म्हणणे पाहता,त्यांचेवरच अन्याय झालेचे दिसून येते.यास्तव सेवकाचे मागील सेवेचा विचार करुन दि.२९/९/२०१४ रोजी बडतर्फ आदेश रद्द करण्यांत येत आहे.सदरहू सेवकांची निलंबित कालावधी मार्यादा सलग सेवा म्हणून ग्राहय धरण्यात यावा. सदर सेवकास नियमानुसार मे.न्यायालयाच्या निर्णयास अधीन राहून पेन्शन व इतर देय रक्कम देणेस, मा. स्थायी समिती ठराव क्र. ४९९, दिनांक १९-१२-१४ अन्वये घेतलेल्या निर्णयाप्रमाणे मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही ठेवणेस मान्यता देणेत येत आहे. आणि सदर ठरावाची मा. आयुक्त यांनी तातडीने अंमलबजावणी करुन संबंधिताच्या उदरनिर्वाहाकरिता देय रक्कमा अदा करुन पेन्शन सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~समुली~~/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 29 ठ. क्र. 66 दि. 21.6.15 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.

एकवट मानधनावरील अवेक्षक (स्थापत्य) उमेदवारांना नव्याने मानधनावर नियुक्ती देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व वस्तुस्थितीचा विचार होऊन प्रस्तावात नमूद (१) कु. मेटकरी दिपाली प्रकाश - नगरअभियंता (२) कु. दिलपाक शिपाली सुभाष - नगरअभियंता (३) श्री. मसलखांब मनोज उत्तम - वि.का.क्र. ३ (४) श्री. बागवान अमीर अ. रशीद - वि.का.क्र. ५ (५) श्री. गायधनकर राघवेंद्र कृष्णा - वि.का.क्र. ८ सदर सेवकांना अर्धवेळ ऐवजी र.रु. १२०००/- यावर पूर्णवेळ एकवट मानधनावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देणे उचित होणार असल्याने, आणि सदर सेवकांच्या नियुक्तीस एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असलेने सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती मार्फत मा.म.न.पा.चे मान्यतेस्तव पाठविणेकामी मा. प्र. आयुक्त यांचे दिनांक १८-३-१५ चे टिपणीप्रमाणे मा.म.न.पा.ची मान्यता मिळणेस्तव मा. स्थायी समिती ठराव क्र. ४, दिनांक १०-४-१५ चे शिफारशीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 22 ठ. क्र. 64
दि. 8/6/15 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



क्रिडा कार्यालयाकडील एकवट मानधनावरील जीवरक्षकांचे नियुक्तीस मुदतवाढ देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदर सेवक हे अत्यावश्यक व जबाबदारी असलेल्या जीवरक्षक पदी नियुक्त व कार्यरत असलेने व त्यांची मुदत दि. २-४-२०१५ रोजी संपुष्टात येत असलेने त्यांना सहा महिन्याच्या कालावधीकरिता एकवट मानधन रु. ३०००/- यावर शर्ती व अटीस अधिन राहून दि. ३-४-१५ व दि. ४-४-१५ असे दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि. ५-४-२०१५ पासून पुढे सहा महिन्याच्या कालावधीकरिता मुदतवाढ देणेस, सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती मार्फत मा.म.न.पा.ची मान्यता मिळणेकामी मा. प्र. आयुक्त यांचे दिनांक १९-३-१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थायी समिती मार्फत मा.म.न.पा.चे मान्यतेस्तव मा. स्थायी समिती ठराव क्र. ५ दिनांक १०-४-१५ चे शिफारशीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

प्रत्येक वर्षी दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन क्रिडा कार्यालयाकडील एकवट मानधनावरील जीवरक्षकांचे नियुक्तीस मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे. आणि र.रु. ६०००/- याप्रमाणे एकवट मानधन वाढविण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका